**महाराष्ट्र विधानपरिषद**
**पहिले अधिवेशन, २०२६**

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ / फाल्गुन २२, १९४७ (शके)**

**(१) महसूल मंत्री**
**(२) वने मंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) कृषी मंत्री**
**(५) सामाजिक न्याय मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**
**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

**मुख्यमंत्री कृषी शाश्वत सिंचन योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(१) * ७५२२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुख्यमंत्री कृषी शाश्वत सिंचन योजनेंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांसाठी सन २०२५- २६ मध्ये सुमारे १०० कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणा करूनही प्रत्यक्षात केवळ १५ कोटी रुपयांचीच प्रशासकीय मंजुरी देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर राज्यात सुमारे ४६ लाख ५८ हजार ३२० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्षात सदर योजनेतंर्गत शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन, शेततळे, अस्तरीकरण, हरितगृह व शेडनेट आदी घटकांचे अनुदान अद्यापही मिळाले नसून सुमारे १५ कोटी रुपयांच्या मर्यादित निधीमुळे अनुदान न मिळालेल्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र प्रतीक्षा यादी देखील अद्याप तयार करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी दखल घेऊन, सदर योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांची प्रतीक्षा यादी तयार करुन पात्र शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी उर्वरित ८५ कोटी रुपयांचा मंजूर असलेला निधी पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

कृषी विभागाच्या दिनांक २४/०४/२०२५ च्या शासन निर्णयानुसार सन २०२५-२६ मध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषी योजनेच्या अंमलबजावणीकरीता सुक्ष्म सिंचन या बाबीसाठी रुपये ४००.०० कोटी व वैयक्तिक शेततळे बाबीसाठी रुपये १००.०० कोटी अशी एकूण रुपये ५००.०० कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

त्यापैकी वैयक्तिक शेततळे या बाबीसाठी आवश्यकतेनुसार रुपये १५.०० कोटी इतका निधी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वितरीत करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

मुख्यमंत्री कृषी शाश्वत सिंचन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन व शेततळे या योजना राबविण्यात येतात. सदर योजनेंतर्गत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर महाडीबीटी पोर्टलवरुन घेण्यात आलेल्या माहितीनुसार सुक्ष्म सिंचन या बाबीसाठी राज्यात एकूण ८,२६,९८१ व वैयक्तिक शेततळे या बाबीसाठी राज्यात एकूण २६,९७२ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

मुख्यमंत्री शाश्वत कृषी योजनेंतर्गत अस्तरीकरण, हरितगृह व शेडनेट या बाबी समाविष्ट नाहीत. शेततळ्याची कामे ही मुख्यत: रबी हंगामातील पिके निघाल्यानंतर म्हणजेच माहे फेब्रुवारी अखेर पासून ते माहे मे या कालावधीत होतात. त्यामुळे जशीजशी शेततळ्याची कामे पूर्ण होतील त्याप्रमाणे मागणीनुसार जिल्हास्तरावरून संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अनुज्ञेय अनुदान वितरीत करण्यात येते.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर निवड करण्यात आलेल्या २६९७२ अर्जांपैकी आवश्यक कागदपत्रे विहित मुदतीत अपलोड न करणे, शेतजमीन शेततळयासाठी तांत्रिकदृष्टया योग्य नसणे, इत्यादी कारणामुळे १७२१४ अर्ज रद्द झाले असून सद्य:स्थितीत ९७५८ अर्ज कार्यवाहीत आहेत. कार्यवाहीत असलेल्या अर्जांपैकी ७४६८ शेतकऱ्यांनी आवश्यक कागपदपत्रे अपलोड केली असून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या ४२३२ अर्जांना पूर्वसंमती देण्यात आली आहे. दिनांक ०२/०३/२०२६ अखेर ११२५ शेतकऱ्यांकडून काम पूर्णत्वाचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यापैकी ८५३ शेततळी तांत्रिकदृष्टया परिपूर्ण असल्याने त्यांचे अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित शेततळयांच्या कामांना तांत्रिक मार्गदर्शन करून ती कामे तांत्रिकदृष्टया परिपूर्ण करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

दिनांक ०२/०३/२०२६ अखेर अनुदान वितरणासाठी शिफारस करण्यात आलेल्या ८५३ शेततळयांपैकी ६७३ शेततळयांना रुपये ४.३२ कोटी इतके अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. तांत्रिकदृष्टया योग्य पध्दतीने काम पूर्ण होऊनही शेततळयास अनुदान मिळाले नाही किंवा अनुदान मिळण्यास दिरंगाई होत असल्याबाबतची तक्रार जिल्हास्तरावर प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड व पालघर जिल्ह्यांकरीता प्रशासकीय भवन मंजूर करण्याबाबत**

**(२) * ७१८७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) शहरातील २६ प्रशासकीय कार्यालये गत ६४ वर्षांपासून भाड्याच्या जागेत सुरू असून, पालघर जिल्ह्यातील कार्यालयेही भाड्याच्या जागेत सुरू असल्यामुळे भाड्याच्या स्वरुपात प्रत्येक वर्षी कोट्यवधी रुपये खर्च होत असून विखुरलेल्या परिसरात कार्यरत असणाऱ्या या कार्यालयांमुळे जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर दैनंदिन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे, डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध कामांसाठी वेगवेगळया कार्यालयात येणाऱ्या लोकांची गैरसोय होऊ नये आणि कामकाज गतिमान व्हावे याकरीता जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली यावीत यासाठी शासनाने प्रशासकीय भवन ही संकल्पना राबविण्याचे जाहीर केले असून लातूर, सिंधुदुर्ग, वाशीम, नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये ही संकल्पना राबविण्यात आली परंतु रायगड व पालघर जिल्हात मात्र अद्यापही याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय तसेच यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, रायगड व पालघर जिल्ह्यांकरीता प्रशासकीय भवन मंजूर करून सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत रायगड जिल्ह्यातील अलिबाग शहरात स्थित असलेल्या कार्यालयांपैकी १९ कार्यालये ही खाजगी इमारतीमध्ये भाड्याच्या जागेत आहेत. तथापि, नागरीकांच्या गैरसोईबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पालघर, पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर प्रशासकीय ईमारत "अ" व प्रशासकीय ईमारत "ब" तसेच जिल्हा स्तरावरील इतर ६० कार्यालये, पालघर जिल्हा मुख्यालय, कोळगाव येथे एकाच आवारात कार्यान्वित आहेत. तसेच १) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, २) उप वनसंरक्षक, डहाणू, ३) सामाजिक वनीकरण, ४) मृद व जलसंधारण अधिकारी, ठाणे व ५) अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, पालघर हे जिल्हा मुख्यालयात स्थलांतर झालेले नाही. त्याबाबत या कार्यालयांना एकत्रित जिल्हा मुख्यालयात स्थलांतर करण्याबाबत आवश्यक ते निर्देश करण्यात आले आहे.
(३) पालघर जिल्ह्यामध्ये ६० कार्यालय पालघर जिल्हा मुख्यालय, कोळगाव येथे एकाच आवारात कार्यान्वित आहेत. ५ कार्यालयांना एकत्रित जिल्हा मुख्यालयात स्थलांतर करण्याबाबत आवश्यक ते निर्देश करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हा तसेच तालुका स्तरावर दैनंदिन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले नसल्याने जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयाचे प्रशासकीय भवन उभारण्याचे प्रस्तावित नाही. तथापि, प्रशासकीय भवन उभारण्याच्या अनुषंगाने मागणी प्राप्त झाल्यास जागेची व आवश्यक त्या निधीची उपलब्धता विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## छत्रपती संभाजीनगर विभागामधील टाकणकार या अनुसूचित जमातीचे बनावट जात वैधता प्रमाणपत्रांबाबत

**(३) * ७४६४ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर विभागात काही मुस्लीम धर्मियांनी प्रत्यक्ष टाकणकार जमातीचे अस्तित्व नसतानाही बनावट व खोटे दस्तऐवज तयार करुन स्वत:ला टाकणकार जमातीचे असल्याचे भासवून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची दिशाभूल करुन त्यांनी अनुसूचित जमातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र मिळविले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुस्लीम धर्मियांकडे सन १९५० चा कोणताही पुरावा नसताना अर्जात खोटी माहिती देऊन शासनाची दिशाभूल करुन तसेच राजकीय दबावतंत्र व पैशाचा वापर करुन जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र मिळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाची दिशाभूल व फसवणूक करून जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र मिळविणाऱ्या मुस्लीम धर्मियांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ रद्द करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ.अशोक उईके :** (१), (२) व (३) टाकणकार या अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र मिळण्यास्तव मुस्लीम समाजातील ५ अर्जदारांनी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे व २१ अर्जदारांनी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, किनवट यांच्याकडे आजतागायत अर्ज सादर केले असल्याचे निदर्शनास आले आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे प्राप्त झाालेल्या ५ अर्जांची समितीने अधिनियम २००० व नियम २००३ मधील तरतूदींनुसार तपासणी करुन, त्यापैकी ४ अर्ज अवैध केली आहे. उर्वरीत १ अर्जदारास मा.उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशानुसार समितीकडून टाकणकार अनुसूचित जमातीचे सशर्त वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, किनवट यांच्याकडे प्राप्त झालेल्या २१ अर्जांची समितीने अधिनियम २००० व नियम २००३ मधील तरतूदींनुसार तपासणी करुन त्यापैकी ११ अर्ज अवैध केले आहेत. उर्वरित १० अर्जदारांना मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार व उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे समितीकडून टाकणकार या अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांना इंदौर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याबाबत

**(४) * ७०६५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.दादाराव केचे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदौर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३-एल साठी मुक्ताईनगर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या असून त्या जमिनींचा योग्य मोबदला मिळालेला नसल्याने व संपादित क्षेत्राविषयी सुस्पष्टता नसल्याने संबंधित शेतकऱ्यांना नोटीसा बजाविल्यानंतर त्यांच्या शेतजमिनीचे सीमांकन करावे असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला दिले असल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुक्ताईनगर तालुक्यातील पोट हिश्श्याची मोजणी न करता शेत जमिनीची मोजणी परस्पर करून त्या संपादित केल्यामुळे मोबदल्याची रक्कम स्वीकारताना अडचणी येत असून शासनाने अध्यादेश काढल्यामुळे प्रकल्पग्रस्तांवर मोठा अन्याय होत असून यासंदर्भात प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग ७५३-एल साठी शेत जमिनीची भूसंपादन झाले असून रस्त्याचे काम सुरू असताना अनेक ठिकाणी खाजगी क्षेत्र जमिनीवर ठेकेदाराकडून अतिक्रमण केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार मुक्ताईनगर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे सीमांकन करून त्यांना योग्य मोबदला देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३-एल चे विस्तारीकरणासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या ७/१२ वर एका पेक्षा जास्त सहधारकांची नावे असल्याने त्यांचे किती क्षेत्र याबाबत स्पष्टता होत नसल्याने अशा जमिनींचा मोबदला वाटप करणे सुलभ व्हावे तसेच इतर मागण्यांकरीता जिल्हाधिकारी, जळगांव कार्यालयामध्ये दिनांक २२/१२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये संबंधित शेतकऱ्यांनी संबंधित क्षेत्राची पोटहिस्सा मोजणी करणे आवश्यक असल्याचे निश्चित करण्यात आले.

शासन परिपत्रक दिनांक २४/०१/२०२३ अन्वये भुसंपादनाची अधिसुचना निर्गमित झालेल्या दिनांकाचे एक वर्षातील खरेदी विक्री व्यवहार वगळण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. ८२९६/२०२३ मध्ये सदरचे परिपत्रक रद्द ठरविले असल्याने मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार शासनाने दिनांक २१/०१/२०२६ रोजी सर्व जिल्हाधिकारी यांना उचित कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

(३) सदर राष्ट्रीय महामार्ग ७५३ एल च्या बांधकामामध्ये खाजगी जमिनीवर अतिक्रमण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) दिनांक २२/१२/२०२५ च्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगाव व उपअधीक्षक भूमी अभिलेख,

मुक्ताईनगर यांच्यामार्फत मुक्ताईनगर व सातोड येथील संपादित जमिनीची मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून याबाबतचा संयुक्त मोजणी अहवाल सक्षम प्राधिकारी (भूसंपादन), भुसावळ यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला आहे. सदर अहवालानुसार भूसंपादन मोबदला अदा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

## बीड जिल्ह्यासह राज्यातील शेतकऱ्यांना प्रती थेंब अधिक पीक योजनेंतर्गत अनुदान वितरीत करण्याबाबत

**(५) * ७७०० श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ठिबक सिंचन पीक योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील २ हजार ६६९ पात्र शेतकऱ्यांना अद्याप ६ कोटी २० लाख रुपयांचे अनुदान मिळाले नसल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने प्रती थेंब अधिक पीक योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांच्या अनुदानाची प्रक्रिया जलद गतीने राबवून त्यांना निधी उपलब्ध करून देणे, ऑनलाइन पोर्टलद्वारे अर्ज स्वीकारणे, पात्र शेतकऱ्यांची पडताळणी करणे आणि थेट बँक खात्यात रक्कम जमा करणे यांसारख्या उपाययोजना केल्या असून अनुदान लवकर मिळण्याकरीता बीड जिल्ह्यासह राज्यातील सदर योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी कृषी विभागाकडून बैठका घेतल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यासह राज्यातील प्रती थेंब अधिक पीक योजनेसाठी पात्र झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने अनुदान वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

सन २०२५-२६ मध्ये बीड जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील लाभार्थी शेतकऱ्यांना पहिल्या हप्त्यात दिनांक १६/०५/२०२५ रोजी केंद्र व राज्य हिश्श्यापोटी रुपये ४९३.३४ लाख निधी व दुसऱ्या हप्त्यात दिनांक ०९/०२/२०२६ रोजी केंद्र व राज्य हिश्श्यापोटी रुपये ३१६.७० लाख असा एकूण रुपये ८१०.०४ लाख निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यामधून सर्वसाधारण लाभार्थी शेतकऱ्यांकरीता सन २०२३-२४ मधील एकूण १२३७ लाभार्थी शेतकऱ्यांना प्रलंबित अनुदानाची रक्कम रुपये ४९३.३४ लाख वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०२५-२६ मधील सर्वसाधारण प्रवर्गातील एकूण १११७ लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये ३१६.७० लाख निधी दिनांक २७/०२/२०२६ अखेर वितरीत करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे बीड जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील एकूण २३५४ लाभार्थी शेतकऱ्यांना एकूण रुपये ८१०.०४ लाख इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

या व्यतिरिक्त मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत सर्वसाधारण लाभार्थी शेतकऱ्यांकरीता टॉप अपसाठी दिनांक २९/०३/२०२५ रोजी पहिला हप्ता रुपये ९०.५३ लाख व दिनांक ०८/१२/२०२५ रोजी दुसरा हप्ता रुपये १५०.०० लाख असा एकूण रुपये २४०.५३ लाख निधी वितरीत केला आहे. आज दिनांक २७/०२/२०२६ अखेर एकूण १६४६ लाभार्थी शेतकऱ्यांना सदर निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(२) होय, हे खरे आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक योजनेच्या (सूक्ष्म सिंचन) प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विविध स्तरावरून वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेण्यात येत आहे.
(३) सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेत निधीची तरतूद केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० टक्के या प्रमाणात आहे.

बीड जिल्ह्यासह राज्यभरात अनुदान प्राप्त झाल्यानंतर maha dbt प्रणालीवरील मोका तपासणी पूर्ण झालेल्या सर्व पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना DBT प्रणालीद्वारे अनुदान वितरीत करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालवन (जि.बीड) येथील सह्याद्री देवराई प्रकल्पास लागलेल्या आगीच्या घटनेची चौकशी करण्याबाबत

**(६) * ७१३३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालवन (जि.बीड) येथील अभिनेता सयाजी शिंदे यांच्या ‘सह्याद्री देवराई’ प्रकल्पाला दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी वा त्यादरम्यान भीषण आग लागून त्यात हजारो झाडे, दुर्मिळ औषधी वनस्पती आणि पशू-पक्षी जळून खाक झाल्यामुळे जैवविविधतेची मोठी हानी झाली असून, आग विझविण्यासाठी वन विभाग, अग्निशमन दल आणि स्थानिक ग्रामस्थांनी प्रयत्न केले, परंतु दुर्गम भाग आणि कोरड्या हवामानामुळे आग विझविण्यास सुमारे ९० मिनिटे लागली आणि या घटनेमुळे निसर्गप्रेमींमध्ये तीव्र नाराजी पसरल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता शासनाने चौकशी करुन सदरहू आगीस जबाबदार असणाऱ्या तसेच चौकशीअंती दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) खरे नाही.

बीड वनपरिक्षेत्रातील सहयाद्री देवराई प्रकल्पास माहे डिसेंबर, २०२५ रोजी आग लागल्याची घटना घडली नाही. तथापि, मौजे पिंपळवाडी वनक्षेत्रात दिनांक २४/१२/२०२५ रोजी किरकोळ आगीची घटना घडली असून आग मोठ्या प्रमाणात नसल्याने वनकर्मचाऱ्यांनी तात्काळ आग विझवल्यामुळे अग्निशमन दलास बोलवण्याची गरज पडली नाही. सदर आगीमध्ये गवत व पालापाचोळा जळालेला असून कोणत्याही पक्षांचा होरपळून मृत्यू अथवा जिवीत हानी झालेली नाही.

आग किरकोळ स्वरुपाची असल्याने तात्काळ विझविण्यात आली असून त्यामध्ये कोणत्याही वन कर्मचाऱ्यांनी कसूर केलेला नाही. तसेच भविष्यात आग लागू नये याकरीता अधिकारी/कर्मचारी यांचेकडून नियमित गस्त केली जाते, जाळ रेषा घेण्यात येतात. वनवणवा नियंत्रणासाठी उपग्रहाद्वारे ॲलर्ट संदेश वेळोवेळी कार्यालयास प्राप्त होतात. त्यानुसार मोक्यावर वेळीच आग विझविण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे बापाणे (ता.वसई, जि.पालघर) येथील आदिवासी कुटुंबाची जमीन बळकाविल्याबाबत**

**(७) * ७०५१ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बापाणे (ता.वसई, जि.पालघर) येथील एका आदिवासी कुटुंबाची भूमापन क्र. २/१, ५/१ आणि १/८८ ही मिळकत श्री.मरियम युनूस कंथारीया या इसमाने बळजबरीने बळकावून या मिळकतीवर अनधिकृतपणे करिश्मा नावाचे हॉटेल व अनधिकृत तबेला उभारले असल्याची बाब दिनांक १२ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित आदिवासी कुटुंबीयांनी त्यांच्या हक्काच्या जमिनीवर बळजबरीने करण्यात आलेल्या कब्जाबाबत उपविभागीय अधिकारी, वसई यांच्याकडे दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी निवेदन दिले असून १० महीने होऊनही त्यांनी याबाबत दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एका आदिवासी कुटुंबियाची जमीन बळकाविणाऱ्या संबंधित इसमावर आणि त्यांच्या बेकायदेशीर कृत्याला अभय देणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर तातडीने ॲट्रॉसिटीचा (अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा) गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) श्री.हरकिसनदास लहानदास यांच्या मालकीच्या सर्व्हे १, २, ८६ व ८८ या जमिनी कु.का.क ३२ ग अन्वये कुळ रघु लडक्या नाईक यांनी खरेदी केल्याचे फेरफार क्रमांक ३११, दिनांक ११/०६/१९६९ पाहता दिसून येत आहे. तथापि, सदरहू फेरफारामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६ अ ला अधीन अशी नोंद घेतल्याचे दिसून येत नाही.

तद्नंतर फेरफार क्रमांक ३३२, दिनांक ०१/०८/१९७१ अन्वये सर्वे नं. २, क्षेत्र ३ एकर ४८ गुंठे व फेरफार क्रमांक ३६१ दिनांक ०९/०४/१९७३ अन्वये सर्वे नं.१ मधील क्षेत्र ५०.५० गुंठे, सर्वे नं.२ मधील क्षेत्र १ एकर ३ गुंठे व स.नं.८८ मधील क्षेत्र ४.७५ गुंठे जमीन श्री.सोमवार रघु नाईक व इतर यांचेकडून श्री.इब्राहिम हाजी आदम कंथारीया यांनी खरेदी घेतल्याबाबत नोंद दिसुन येत आहे. तसेच फेरफार क्रं.५६८, दिनांक ०५/१०/१९९१ अन्वये सदर जमिनीच्या अधिकार अभिलेखात वारसा हक्काने मरीयम इब्राहिम कंथारीया व इतर १९ यांची नावे कब्जेदार सदरी दाखल झालेली आहेत.

तद्नंतर सर्वे नं.१, क्षेत्र ००/०२/६० हे.आर व सर्वे नं. २ मधील भूमापन क्रमांक २/१ ते ५/१/१, क्षेत्र ०/८१/०० हे.आर असे एकूण क्षेत्र ०/८३/६० हे.आर बाबत तहसिलदार, वसई यांचेकडील अनुक्रमे दिनांक १३/०७/२०१७ व दिनांक ०६/०६/२०२४ रोजी बिनशेती आदेश झाल्यानंतर सदर जागेवर करीशमा नावाचे हॉटेल व तबेल्याचे बांधकाम केल्याचे दिसुन येत आहे.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी आदिवासी व्यक्तीकडून बिगर आदिवासी व्यक्तिकडे जमिनीचे विनापरवाना हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आल्यांनतर तहसिलदार, वसई यांनी महाराष्ट्र अनुसुचित जमातीला जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ चे कलम १०-अ नुसार श्री.मरीयम युनुस कंथारिया व श्री.महादु रघु नाईक यांना नोटीस देऊन प्रकरणी दिनांक ०३/१२/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीस श्री.महादू रघु नाईक यांच्या पत्नी हजर होत्या व श्री.मरीयम युनुस कंथारिया गैरहजर होत्या. तद्नंतर सदर प्रकरणी दिनांक १८/१२/२०२५, दिनांक २२/०१/२०२६ व दिनांक २४/०२/२०२६ रोजी ठेवण्यात आलेल्या सुनावणीदरम्यान दोन्ही पक्षकार गैरहजर होते. आता प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०६/०३/२०२६ रोजी ठेवण्यात आली आहे.

शासन पत्र दिनांक २५/०२/२०२६ अन्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी तातडीने घेऊन नियमानुसार गुणवत्तेवर आदेश पारित करण्याचे निर्देश संबंधितांना देण्याबाबत निर्देशीत करण्यात आले आहे.

-----------------

## राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करणेबाबत

**(८) * ६६६९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद तसेच शासकीय शाळांमध्ये मागासवर्गीय मुली व मुलांच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे, त्यांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे व आर्थिक कारणावरून विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून दुरावला जाऊ नये यासाठी सामाजिक न्याय विभागाने लागू केलेल्या शिष्यवृत्ती योजनेत सन २००७ पासून महागाई निर्देशांकानुसार अद्यापपर्यंत कोणतीच वाढ करण्यात आली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता ५ वी ते ७ वी साठी ६० रुपये, इयत्ता ८ वी ते १० साठी १०० रुपये दरमहा शिष्यवृत्ती दिली जात असून १०० रुपयांत विद्यार्थ्यांना वही वा अन्य आवश्यक शैक्षणिक साहित्य सुध्दा खरेदी करता येणे शक्य नसल्याने शासनाने शिष्यवृत्तीमध्ये किमान प्रतिमाह २५० ते ३०० रुपये वाढ करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे गरजेचे असतानाही या शिष्यवृत्तीत महागाई निर्देशांकानुसार वाढ करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येणाऱ्या सर्व शिष्यवृत्तींच्या रकमेत महागाई निर्देशांकानुसार वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अनुसूचित जातीच्या विद्यार्थिनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती या योजनेंतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींना दरमहा रुपये ६० वरुन दरमहा रुपये २५० प्रमाणे वाढ करण्याबाबत व इयत्ता

८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थिनींना दरमहा रुपये १०० वरुन दरमहा रुपये ४०० प्रमाणे वाढ करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बांबू रोपांच्या लागवड योजनेच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(९) * ६६४३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२३ मध्ये बांबू रोपांची लागवड करण्याच्या घोषणेनंतर बांबू रोप खरेदी प्रक्रिया राबविताना झालेल्या गंभीर त्रुटींमुळे शासनास आसाममधील नॉर्थ ईस्ट नर्सरी ॲण्ड सीड्स हाऊस या खाजगी कंपनीला ७९ लाख ८५ हजार रुपयांची भरपाई मा.न्यायालयाच्या आदेशान्वये द्यावी लागल्याची माहिती माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता नसताना व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेचे उल्लंघन करून ३५ लाख बांबू रोपांच्या पुरवठ्याचे कार्यारंभ आदेश दिल्यामुळे शासकीय निधीचा मोठा अपव्यय झाला असून या प्रकरणी जबाबदार असलेल्या प्रधान मुख्य वनसंरक्षक व इतर क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांबू रोप लागवड निविदा प्रक्रियेतील गैरप्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने दोषींवर कारवाई करण्यासाठी व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पुढे कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२३-२४ मध्ये खरेदी केलेल्या बांबू रोपांच्या पुरवठादार यांनी देयके न मिळाल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.७७६/२०२५ दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/११/२०२५ च्या सुनावणीनुसार पुरवठादारास वापरलेल्या बांबू रोपांसाठी रुपये ६८,९३,५२५/- इतकी रक्कम अदा करण्याचे तसेच उर्वरीत बांबू रोपांचे DNA profile test करीता येणारा खर्च समप्रमाणात करण्याबाबत आदेशित केले. त्यानुसार पुरवठादारास रुपये ६८,९३,५२५/- इतकी रक्कम व DNA profile test करणेकरीता रुपये १०,९१,५००/- (५० टक्के शासन हिस्सा) इतकी रक्कम शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना अदा करण्यात आली आहे.
(२) व (३) नॉर्थ ईस्ट नर्सरी ॲण्ड सिड्स हाऊस, आसाम यांना ३५ लक्ष बांबू रोपांचा पुरवठा करणेसाठी ई-निविदेव्दारे दिनांक १७/११/२०२३ अन्वये कार्यारंभ आदेश दिला होता.सदर निविदा प्रक्रिया राबविताना शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ च्या तरतूदींचे उल्लंघन तसेच खरेदी प्रक्रीया सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने व वित्तीय अधिकार मर्यादेनुसार करण्यात आली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याने दिनांक ३०/०५/२०२४ रोजीच्या अ.शा. पत्रान्वये तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे यांना कारणे दाखवा नोटीस बजविण्यात आली होती. त्याअनुषंगाने तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक,

सामाजिक वनीकरण, पुणे यांनी दिनांक २१/०६/२०२४ च्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा व त्यासंदर्भात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांनी दिनांक ३१/०७/२०२४ अन्वये दिलेले अभिप्राय विचारात घेऊन शासनाच्या दिनांक ०४/०२/२०२६ च्या पत्रान्वये तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने दोषारोपपत्रे मागविण्यात आली आहेत. सदर दोषारोपपत्रे प्राप्त झाल्यानंतर शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना येथील दुय्यम निबंधक कार्यालयात गुंठेवारी भुखंडांच्या नोंदणीसाठी अधिक रक्कम घेतली जात असल्याबाबत

**(१०) * ७७५६ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना येथील दुय्यम निबंधक कार्यालयात गुंठेवारी भुखंडांच्या नोंदणीसाठी शासनाच्या नियमांनुसार आकारण्यात येणाऱ्या महसूल शुल्कापेक्षा चार ते पाच पट अधिक रक्कम दुय्यम निबंधक अधिकाऱ्यांमार्फत घेतली जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूखंड नोंदणीच्या एका विशिष्ट प्रकरणात चलनाची रक्कम केवळ रुपये ९,७६० एवढी असताना, संबंधित दुय्यम निबंधक अधिकाऱ्याने या रजिस्ट्रीसाठी सुमारे ४० हजार रुपये अतिरिक्त घेतल्याचे आणि गुंठेवारी नोंदणी बंद असतानाही नियमांच्या विरुध्द सदर रजिस्ट्री केल्याचे पुराव्यानिशी केलेल्या तक्रारीतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित दुय्यम निबंधक अधिकाऱ्याच्या गैरव्यवहाराचा ऑडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असून या अधिकाऱ्याने नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमाचे सर्रास उल्लंघन करुन शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित अधिकाऱ्याची वारंवार जालना येथेच होणारी बदली लक्षात घेता उक्त प्रकरणाची एस.आय.टी.मार्फत चौकशी करुन मागील तीन वर्षातील नोंदण्यांचे लेखापरीक्षण करुन नागरिकांकडून घेण्यात आलेली जादा रक्कम व्याजासह परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली असून नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या दिनांक १३/०२/२०२६ च्या पत्रान्वये उचित कार्यवाही करण्यासाठी सह जिल्हा निबंधक वर्ग-१, जालना व नोंदणी उप महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर यांना निर्देश देण्यात आलेले असून, त्याबाबत नोंदणी उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
तथापि, महसूल नुकसानीबाबत नोंदणी उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) दस्त नोंदणीमध्ये झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री.राजपुत, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, जालना क्र. १ यांची नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक १६/०२/२०२६ च्या आदेशान्वये सह जिल्हा निबंधक वर्ग-१ कार्यालय गडचिरोली येथे बदली करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील लोहारडोंगरी येथे लोह खनिज प्रकल्प प्रस्तावित असल्याबाबत

**(११)** * **७८०८ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहाडोंगरी (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) गावापासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या डोंगर काचेपार या राखीव जंगलात शासनाने एका पोलाद कंपनीस लोहखनिज प्रकल्पासाठी जमीन दिल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून ओपन कास्ट खाणीचा हा परिसर घोडाझरी वन्यजीव अभयारण्याजवळ असून वाघांचा महत्त्वाचा कॉरीडॉर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प उभारणी प्रक्रियेस वन्यजीव संघर्ष आणि सदर प्रकल्पाची संवेदनशीलता विचारात घेऊन राज्य वन्यजीव मंडळाच्या तीन तज्ज्ञ सदस्यांनी विरोध केला असतानाही शासनाने या लोहखनिज प्रकल्पास दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजीच्या बैठकीत मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर, गोंदिया आणि भंडारा जिल्हयांना जोडणाऱ्या ताडोबा-अंधारी व नवेगाव-नागझिरा नैसर्गिक व्याघ्र भ्रमण मार्ग हा लोहारडोंगरी येथील प्रस्तावित लोह खनिज प्रकल्पामुळे धोक्यात येऊन मानव-वन्यजीव संघर्ष अधिकाधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने उक्त निर्णयाबाबत शासनस्तरावर फेरविचार करून सदर प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) चंद्रपूर वनवृत्तातील ब्रम्हपूरी वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील मौजा-लोहारडोंगरी गावातील लोहारडोंगरी ब्लॉक (३५.९४ हे. राखीव वन) M/s Sunflag Iron & Steel Core Limited यांना पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत दिनांक ०३/०९/२०२१ रोजीच्या आदेशान्वये वाटप करण्यात आले आहे. तथापि, अद्याप सदर प्रकल्पाकरीता वन जमीन वळती करण्यात आलेली नाही.

सदर प्रकल्पास वन्यजीव प्रेमी यांनी विरोध केला आहे. दिनांक १६/१०/२०२३ रोजी संपन्न झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या २२ व्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालावर दिनांक २४/०१/२०२४ रोजी संपन्न झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीच्या पहिल्या बैठकीत चर्चा करण्यात आली असून त्रिसदस्यीय समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने सखोल अभ्यास करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तद्नंतर दिनांक ०६/०१/२०२६ रोजी संपन्न झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या २५ व्या

बैठकीमध्ये सदर प्रकल्पास मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी व त्रिसदस्यीय समिती यांनी घालून दिलेल्या अटींच्या अधिन राहून पुढील कार्यवाहीसाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे शिफारसीत करण्यात आले आहे.

सदर खाण प्रकल्प हा १२ वर्षाच्या कालावधीकरीता असून सदर खाण प्रकल्पातून वार्षिक १.१ लक्ष टन लोह खनिज उपलब्ध करणे अपेक्षित असल्याचे त्रिसदस्यीय समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक २३/०२/२०२६ रोजी SUO MOTU PIL क्रमांक ०७/२०२६ व PIL क्रमांक १४/२०२६ या दोन याचिका दाखल करून घेवून सुनावणी घेतली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समितीची सात वर्षांपासून बैठक झाली नसल्याबाबत

**(१२) * ७९७६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती व जमातींवरील अन्याय प्रतिबंधक अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समितीची मागील सात वर्षांपासून एकही बैठक झाली नसल्याची बाब दिनांक ४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार वर्षातून दोन बैठका होणे बंधनकारक असून सुद्धा दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ नंतर एकही बैठक झाली नसल्याने राज्यातील अत्याचारग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन आणि गुन्ह्यांच्या आढाव्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीच्या प्रलंबित बैठकांचे तातडीने आयोजन करून राज्यातील ॲट्रॉसिटी अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ च्या प्रभावी अंमलबजावणीकरीता विभागीय, जिल्हा व उपविभागीय दक्षता व नियंत्रण समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून सदर समितींच्या बैठकांमध्ये सदर अधिनियमांतर्गत दाखल प्रकरणातील पिडीत व्यक्तींना दिलेल्या अर्थसहाय्याचा तसेच त्यांच्या पुनर्वसनाबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा, गुन्हयाचा तपास तातडीने करुन विहीत मुदतीत दोषारोपपत्र दाखल करण्याबाबत केलेली कार्यवाही, न्यायालयात दाखल प्रकरणात केलेली कार्यवाही, दोषसिध्दीचे अल्पप्रमाण, अत्याचाराच्या घटना घडणार नाहीत यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबतीत सविस्तर आढावा नियमितपणे घेण्यात येत आहे.

तसेच या विभागाच्या दिनांक २०/११/२०२५ च्या शासन निर्णयान्वये अधिनियमांतर्गत दाखल खून किंवा अत्याचाराच्या अनुषंगाने झालेल्या मृत्यूच्या प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटूंबातील एका पात्र वारसास शासकीय / निमशासकीय नोकरी देण्याच्या अनुषंगाने सविस्तर कार्यपध्दती विषद करण्यात आली असून सदर कार्यपध्दतीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा नियमितपणे आढावा सदर शासन निर्णयानुसार गठीत राज्यस्तरीय समितीमार्फत घेण्यात येत आहे.
(३) राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समितीची बैठक आयोजित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी लाभार्थ्यांच्या घरकुलांच्या मजुरीची रक्कम प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * ८०५७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी कातकरी तसेच गरीब लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाली असून त्यांना अद्यापी घरकुले मिळाली नसल्याने श्रमजीवी संघटनेने शहापूर पंचायत समिती कार्यालयावर दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घरकुल हक्क मोर्चा काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी कातकरी सह गरीब, भुमिहीन, वंचितानी कर्ज काढून तसेच उधारीवर बांधकाम साहित्याची खरेदी करून घरकुले बांधली असून शासकीय नियमानुसार त्यांना मिळणारी मजुरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने घरकुल लाभार्थ्यांना घरकुले मंजूर होऊनही मजुरी मिळाली नसल्याने सदरहू प्रलंबित असलेली घरकुले /मजूरी मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार रक्कम रुपये ३१२/- इतकी मजुरी प्रति दिवसाकरीता अधिसूचित करण्यात आली आहे. आज रोजी पंचायत समिती, शहापूर यांच्यामार्फत ११३९८ पैकी ७९२६ इतक्या मजुरांची मजुरी त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. उर्वरित ३४७२ मजुरांच्या मजुरीची रक्कम तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित होती तथापि, केंद्र शासनाकडून नुकतेच मजुरीसाठी रक्कम रुपये १४०९ कोटी इतका निधी मंजूर झाला असून निधी वितरणाची बाब प्राधान्याने कार्यवाहीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सन २०२५ मध्ये ३८ वाघांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१४) * ८१०२ श्री.सत्यजीत तांबे, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या (एनटीसीए) अहवालानुसार सन २०२५ मध्ये देशात एकूण १६६ वाघांचा मृत्यू झाला असून त्यापैकी महाराष्ट्रात ३८ वाघांचा मृत्यू झाला असून माहे डिसेंबर, २०२५ ते माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्र प्रकल्प परिसरात दोन वाघांसह चार बछड्याचा मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनास्थळी प्राथमिक तपासणीत कोणताही पुरावा आढळला नसल्याने पेंच व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीव संरक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून वनसंरक्षण यंत्रणेतील त्रुटी, देखभालीतील हलगर्जीपणा अथवा नियोजनाचा अभाव, विषप्रयोग, शिकार, विद्युत प्रवाह किंवा मानवी हस्तक्षेप यासारख्या कारणांमुळे वाघांचा मृत्यू होत असल्याची शक्यता असून, वाघांच्या मृत्यूमुळे जैवविविधतेचे नुकसान व पर्यटनावर प्रतिकूल परिणाम होत आहे तसेच वन्यजीव संरक्षणासाठी येणाऱ्या शासकीय निधीचा अप्रत्यक्षरित्या अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेंच व्याघ्र प्रकल्प परिसरात गस्त वाढविणे, सीसीटीव्ही/ड्रोनद्वारे निगराणी, स्थानिक वनकर्मचाऱ्यांची क्षमता वाढविणे व ग्रामस्थांमध्ये जनजागृती करणे यासारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याबाबत तसेच राज्यात वाघ संरक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी वनसंरक्षण धोरणात आवश्यक सुधारणा करण्याबाबत व मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) देशात सन २०२५ मध्ये १६६ वाघांचा मृत्यू झाला असून त्यापैकी ४१ वाघांचा मृत्यू महाराष्ट्रात झाला आहे.

• पेंच प्रकल्पांतर्गत दिनांक ०२/१२/२०२५ रोजी सालेघाट (वन्यजीव) येथील कक्ष क्र. ३२९ मधील नाल्याच्या बाउंड्रीवर एक मृत वाघाचे संपुण अवयवासह शव आढळून आले आहे. प्रथमदर्शनी सदर वाघाचा मृत्यू नैसर्गिक रित्या झाल्याचे आढळून आले आहे.

• दिनांक ०७/०१/२०२६ रोजी देवलापार (वन्यजीव) नियतक्षेत्र क्षेत्र गर्रा उपवनक्षेत्र खुर्सापार कक्ष क्रमांक ५०० येथे एक वाघ (बछडा) मृत अवस्थेत आढळून आला असून प्रथमदर्शनी सदर वाघाचा मृत्यू आपसी झुंझीत झाला असल्याचे आढळून आले आहे.

• दिनांक ०७/०१/२०२६ रोजी देवलापार (वन्यजीव) नियतक्षेत्र खुर्सापार कक्ष क्रमांक ५०९ येथे एक वाघाचा (बछडा) कुजलेल्या अवस्थेत शव आढळून आले असून प्रथमदर्शनी सदर वाघाचा मृत्यू नैसर्गिक रित्या झाल्याचे आढळून आले आहे.

(३) विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते. M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना करण्यात आला असून त्याद्वारे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते.

रॅपिड रेस्क्यु युनिट, टीसीसी व हत्ती मागोवा दलासाठी पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

वाघांच्या संरक्षणार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :- • जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.

• अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी गुप्त सेवा निधीचा वापर करण्यात येतो.

• अतिसंवेदशील क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

• जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरे तयार करण्यात आले आहेत.

• राज्यातील वन्यप्राण्यांबाबत गुन्हे प्रकरणांची अद्यावत माहिती ठेवणेकरीता वन्यजीव गुन्हे कक्ष Wildlife Crime Cell प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर येथे तयार करण्यात आला आहे व सदर कक्षाचे बळकटीकरण करण्यात येत आहे. तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.

• अतिसंवेदनशिल क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके तयार करण्यात आले असून त्याद्वारे, येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करण्यात येते.

• परिक्षेत्र स्तरावर वाघ व बिबट या वन्यप्राण्यांचे मागोव्याचा पंधरवडी कार्यक्रम राबवून त्यांच्या अस्तित्वाबाबतची माहिती घेण्यात येते. गावालगत असलेल्या मुसाफिर लोकांचे डेरे तपासणी करण्यात येते व त्यांचे हालाचालींवर लक्ष ठेवण्यात येते.

• वाघाचे भ्रमणमार्ग,पाणवठे व महत्वाचे ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून संशयास्पद हालचालीवर पाळत ठेवण्यात येते. तसेच पाण्यामध्ये विष प्रयोग होऊ नये याकरीता नियमीत पाणवठ्याची तपासणी केली जाते. या व्यतिरीक्त मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने पाणवठ्याकडे जाणाऱ्या मार्गावर शिकारी लोकांव्दारे लोखंडी ट्रॅप लावले नसल्याची खातरजमा करण्यात येते.

मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

• स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.

• आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

• नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्राण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.

• वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत येत आहे.
• हिंस्त्र प्राण्यांचे मानवांवरील हल्ले कमी करण्यासाठी आर्टिफिशल इंटेलिजन्स (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बार्टी तर्फे जे.ई.ई व नीट परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची गोपनीय माहिती उघड होत असल्याबाबत**

**(१५) * ८३३८ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) 'बार्टी' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे) मार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी जे.ई.ई आणि नीट परीक्षांच्या तयारीसाठी एक विशेष मोफत प्रशिक्षण योजना राबविली जात असून, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नामांकित खाजगी कोचिंग इन्स्टिट्यूटमध्ये जे.ई.ई (अभियांत्रिकी प्रवेशासाठी) आणि नीट (वैद्यकीय प्रवेशासाठी) परीक्षेचे मोफत मार्गदर्शन देण्यात येऊन प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्याला दरमहा ६,००० रुपये विद्यावेतन दिले जाते (यासाठी ७५% उपस्थिती अनिवार्य असते) व पुस्तके आणि इतर साहित्यासाठी एकरकमी ५,००० रुपये मदत दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बार्टी तर्फे जे.ई.ई व नीट परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची गोपनीय माहिती खाजगी शिकवणीला दिल्यामुळे नागपूर कार्यालयाचे सहायक प्रकल्प व्यवस्थापकाला महासंचालकाकडून कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बार्टी तर्फे जे.ई.ई व नीट परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची गोपनीय माहिती खाजगी शिकवणीला देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी बार्टीच्या नागपूर कार्यालयाचे सहायक प्रकल्प व्यवस्थापक यांच्याकडून दिनांक ३१/१०/२०२५ रोजी लेखी खुलासा मागवून घेण्यात आला आहे. सदर खुलासामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची गोपनीय माहिती खाजगी शिकवणीला दिली नसल्याचे म्हटले आहे. शिवाय बार्टीच्या संस्थेच्या स्तरावर माहिती घेवून खात्री केली असता अशा प्रकारची गोपनीय माहिती खाजगी शिकवणीला दिल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे संबंधित सहायक प्रकल्प व्यवस्थापक यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नागरिकांना अडचणी येत असल्याबाबत

**(१६) * ८३७३ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यास नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून, नागरिकांना प्रमाणपत्रासाठी उपविभागीय कार्यालयाकडे पाठविले जात असून उपविभागीय कार्यालयात नागरिक गेल्यानंतर उपविभागीय कार्यालयाला नियमित प्रमाणपत्र देण्याचे अधिकार नसल्याने घाटीतील कार्यालयात जाण्याचा सल्ला दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घाटीतील कार्यालयातून उपविभागीय कार्यालयात वारंवार जावे लागत असल्यामुळे नागरिकांना प्रचंड शारिरिक व मानसिक मनस्ताप सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांना वेळेत जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मिळण्याकरीता शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) घाटीमध्ये जन्म झालेल्या शिशुंचे १ ते ३० दिवसांमध्ये जन्म नोंदी घेण्याचे अधिकार घाटीला आहेत. तसेच, ३१ दिवस ते १ वर्षांपर्यंतचे अधिकार जिल्हा निबंधक यांना आहेत. शासन राजपत्र दिनांक ११/०८/२०२३ नुसार जन्म-मृत्यू होऊन १ वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेल्या नागरिकांना उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देणेबाबत आदेश निर्गमित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार उपविभागीय कार्यालयाकडून विलंबित जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरीत करणेबाबतचे आदेश देण्यात येतात.

या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १२/०३/२०२५, दिनांक २९/०५/२०२५ व दिनांक १६/०९/२०२५ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच महसूल विभागाने अवैध विलंबित जन्म-मृत्यू नोंदी रद्द करुन प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मार्गदर्शक सूचना दिनांक १/१२/२०२५ च्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सन २०२२-२३ मधील आपत्तीग्रस्तांचा निधी अद्यापही वितरीत केला नसल्याबाबत

**(१७) * ८३१२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अतिवृष्टी, पूर, दुष्काळ व अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकरी व नागरिकांसाठी सुमारे ७०० कोटी रुपयांचा मदतनिधी मंजूर करण्यात आला असून देखील सदरहू निधीचे वितरण केवळ विभागाच्या कामातील

दिरंगाईमुळे अद्याप प्रलंबित असल्याची माहिती माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित आपत्तीग्रस्तांना मदत देण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, पंचनामे व प्रस्ताव शासनाकडे वेळेत सादर करण्यात आले असतानाही निधी वितरित न झाल्यामुळे शेतकरी व नागरिकांना आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाकडून अपेक्षित निधी प्राप्त होऊनही किंवा राज्य शासनाच्या आपत्ती निवारण निधीत उपलब्धता असूनही सन २०२२-२३ चा ७०० कोटी रुपयांचा निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात विलंब होत असल्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रलंबित निधी तातडीने वितरित करून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१), (२) व (३) अतिवृष्टी व अवेळी पाऊसामुळे झालेल्या सन २०२२-२३ मधील ५८.०३ लक्ष शेतकऱ्यांना रुपये ४७५३ कोटी DBT द्वारे शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात निधी वितरित करण्यात आला. उर्वरित रुपये १११ कोटी एवढा निधी वितरणाची कार्यवाही पुढील कारणामुळे पूर्ण होऊ शकली नाही. यामध्ये शेतकऱ्यांकडून E- KYC न होणे, बाधित क्षेत्राबाबत तहसिल स्तरावर फेर तपासणी करणे, शेतकऱ्यांची वारसदार नोंदणी नसणे, द्विरुक्ती नावे तपासणी, सयुंक्त कुटुंबामध्ये पात्र लाभार्थी ठरविणे, पात्र शेतकऱ्यांचे बाधित क्षेत्र निर्धारित करणे, इ. कारणास्तव निधी वाटप प्रलंबित असून या बाबी निवारण्याची कार्यवाही सुरु असून जशी जशी प्रक्रिया पूर्ण होत आहे. त्यां लाभार्थ्यांना DBT प्रणालीद्वारे निधी वितरित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे भाईंदरपाडा (ओवळे) (जि.ठाणे) येथील वन विभागाच्या जमिनीची नोंद महसूल विभागाने रद्द केल्याबाबत

**(१८)** * **७७८४ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील घोडबंदर मार्गावरील भाईंदरपाडा–ओवळे येथील १,०५३ एकर जमीन वन विभागाच्या ताब्यात असून महसूल दप्तरी ती 'राखीव वन' म्हणून नोंदवलेली असून 'महाराष्ट्र शासन वन विभाग राखीव वने' ही नोंद रद्द करुन सदर जमीन खाजगी व्यक्तींच्या नावे करण्याबाबत कोकण विभागीय आयुक्तांच्या निर्णयावर मा.महसूल मंत्र्यांनी मान्यता दिल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वन विभागाच्या ताब्यातील जमीन खाजगी विकासकाला दिल्यामुळे घनदाट जंगलाने व्यापलेल्या या जागेवर आता गगनचुंबी इमारती उभारण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभागाची जमीन असताना महसूल विभागाने सदर जमीन खाजगी विकासकास देण्यास परवानगी देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर जमीन खाजगी विकासकास देण्यास परवानगी देणाऱ्या संबंधित दोषीविरुध्द शासनस्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे भाईंदरपाडा (ओवळे) येथील भू. क्र. २२/१, २२/४,२२/५ व २१ (जुने भू. क्र. २९१ व २९७) या भूखंड/ जमीन संदर्भात, भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम, ३५ (१) खालील तत्कालीन मुंबई सरकारची अधिसूचना दिनांक १०/०१/१९६० रोजी प्रसिध्द करण्यात आली. तसेच दिनांक १०/०८/१९७५ रोजी भारतीय वन अधिनियमाच्या कलम ३५ (३) अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. दि ०१/०९/१९७५ रोजी भारतीय वन अधिनियमाच्या कलम ३५ खाली जमिनीचा ताबा वन विभागाने घेतला. त्यानुषंगाने फेरफार नोंद क्र. १९१५ दिनांक २७/०९/१९८७ रोजी, ७/१२ सदरी "महाराष्ट्र शासन वन विभाग,राखीव वने" अशी नोंद घेण्यात आली. जमिनीच्या धारकांनी दिनांक १३.१०,१९७५ रोजी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचेकडे उपरोक्त जमीन, महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ च्या कलम ६ अन्वये वन नाही हे अभिनिर्णीत करून मिळण्यासाठी अर्ज केला होता.परंतु सन १९९७ पर्यंत सदर अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने, जमीन धारकांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ४१२/१९९७ मध्ये, उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी महाराष्ट्र खाजगी वने(संपादन) अधिनियम १९७५ च्या कलम ६ अन्वये चौकशी करण्याचे निर्देश दिले. उपविभागीय अधिकारी ठाणे यांनी, दि २४/११/२००६ च्या निर्णयाद्वारे उपरोक्त जमिनीपैकी १० एकर क्षेत्र वन नसल्याचे जाहीर केले. उपविभागीय अधिकारी ठाणे यांच्या दिनांक २४/११/२००६ च्या निर्णयाविरुध्द, मा.महाराष्ट्र महसूल प्राधिकरण यांचे कडे महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ च्या कलम १८ खाली अपील दाखल करण्यात आले. मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने, उपरोक्त मिळकती च्या मूळ मालकांना भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम ३५(३) अन्वये वैयक्तिकरित्या नोटीस बजावली नसल्याने उपरोक्त क्षेत्र वन या संज्ञेत मोडत नसल्याचे दिनांक ०५/०३/२०१५ रोजी निर्णय दिला. मा महसूल न्यायाधिकरणाच्या दिनांक ०५/०३/२०१५ च्या निर्णयाच्या अनुषंगाने तत्कालिन तलाठी/मंडळ अधिकारी यांनी फेरफार नोंद क्र. ९७५ अन्वये दिनांक "महाराष्ट्र शासन राखीव वने" नोंद कमी करण्यात येऊन मूळ मालकांची नावे दाखल करण्यात आली होती.

उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी फेरफार नोंद क्र ९७५ चा चुकीचा अंमल दिला म्हणून फेरतपासणी कार्यवाहीमध्ये दिनांक ०१/०८/२०१५ रोजी रद्द केली. उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचा निर्णय अप्पर जिल्हाधिकारी यांनी दिनांक २१/०३/२०१७ रोजी कायम केला आहे. अप्पर विभागीय आयुक्त यांनी, फेरतपासणी कार्यवाहीमध्ये अप्पर जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची फेरफार नोंद क्र ९७५ रद्द करण्याची कार्यवाही दिनांक ११/०१/२०१९ रोजी रद्द केली आहे. जमीन धारकांनी मा.उच्च न्यायालयात, अप्पर विभागीय आयुक्त यांच्या दिनांक ११/०१/२०१९ च्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने, रिट याचिका दाखल केली. (क्र.१३४४/२०२५) मा.उच्च न्यायालयाने जमीन धारक यांचेकडून जमिनीचा वापर अन्य कारणांकरीता करण्यासाठी परवानगी अर्ज करण्यापूर्वी शासनास ८ आठवड्याची नोटीस दिली जाईल व फेरफार नोंद क्र ९७५ ही मुंबई उच्च न्यायालयातील रिट याचिका

क्र. ४५३५/२०१६ च्या निर्णयाच्या आधीन असेल, असे हमीपत्र घेतले. जमीन धारकांच्या हमीपत्राच्या अनुषंगाने, मा न्यायालयाने दिनांक ०७/०५/२०२५ च्या आदेशाद्वारे, अप्पर विभागीय आयुक्त यांच्या दिनांक ११/०१/२०१९ च्या आदेशाची अंमल बजावणी आठ आठवड्यात करण्याबाबत निर्देश दिले. मात्र तहसिलदार ठाणे यांनी मा उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. १३४४/२०२५ ची अंमल बजावणी न केल्याने, जमीन धारकांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे अवमान याचिका क्र. ४९९/२०२५ दाखल केली. दिनांक ३०/०६/२०२५ च्या आदेशाने मा न्यायालयाने, रिट याचिका क्र.१३४४/२०२५ मध्ये दिनांक ०७/०५/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी पुढील तारखे पर्यंत करण्या बाबत निर्देश दिले. तद्नंतर जिल्हाधिकारी ठाणे यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी शासनाकडे फेरतपासणी अर्ज केला. मा उच्च न्यायालायाने रिट याचिका क्र १३४४/२०२५ मध्ये दि ०७/०५/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशाची अंमल बजावणी न झाल्याने व तद्नंतर मा.उच्च न्यायालयात सुरु करण्यात आलेल्या अवमान कार्यवाहीच्या अनुषंगाने फेरफार नोंद क्र ९७५ पुनर्जीवित करणे बाबत दिनांक ३१/१२/२०२५ रोजीचे आदेशान्वये निर्णय दिलेला आहे. महसूल व वन विभागाने सादर केलेल्या पुनर्विलोकन अर्जाच्या अनुषंगाने, शासनाच्या दिनांक ३१/१२/२०२५ च्या निर्णयाच्या अंमलबजावनीस स्थगिती दिलेली असून, वन विभागाचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी पुनर्विलोकन कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

महसूल संहितेतंर्गत मालकी हक्काचे अभिलेख अद्यावत करण्याची कार्यवाही केली जाते. फेरफार नोंदी या केवळ राजकोषीय उद्देशासाठी केलेल्या जातात. फेरफार नोंदीद्वारे मालमत्तेचा स्वामित्व हक्क अथवा त्याचे स्वरूप हे अभिनिर्णित केले जात नाही. विविध अधिनियमातर्गत, सक्षम प्राधिकाऱ्याने / मा.न्यायालयाने पारीत केलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे, महसूल संहितेअंतर्गत फेरफार नोंदीद्वारे अभिप्रेत आहे. या प्रकरणात सक्षम न्यायाधिकरण म्हणजे मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने, महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ च्या कलम १८ खाली, उपरोक्त जमीन 'वन' नसल्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणी अधिकार अभिलेख अद्ययावत करण्यासाठी करण्यात आली आहे. या बाबतचे हमीपत्र जमीन धारकांनी मा न्यायालयात रिट याचिका क्र. १३४४/२०२५ मध्ये दिले आहे. वन विभागाने मा महाराष्ट्र महसूल न्यायाधीकारणाचा दि ०५/०३/२०१५ चा निर्णय मा उच्च न्यायालयात आव्हानीत केलेला आहे.

(२) शासनाचा दि ३१/१२/२०२५ चा निर्णयाची अंमलबजावणी स्थगीत करण्यात आली आहे. फेरफार नोंद क्र ९७५ पुनर्जीवित करण्याची कार्यवाही हि मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या रिट याचिका क्र ४५३५/२०१६ च्या आधीन आहे. रिट याचिका क्र. १३४४/२०२५ मध्ये दिलेल्या हमीपत्राच्या अनुषंगाने, जमीन मालकांना जमिनीचा वापर अन्य कारणासाठी करण्यासाठी, जमीन धारक यांना, शासनास नोटीस देणे बंधन कारक आहे. तसेच मालकी हक्काचा निर्णय मा उच्च न्यायालयातील प्रलंबित याचिका क्र ४५३५/२०१६ च्या आधीन आहे.

(३) उपरोक्त परीछेद क्र १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, मा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने, महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ च्या कलम १८ अन्वये, उपरोक्त जमीन ही वन नसल्याचे जाहीर केले आहे. मा महसूल न्यायाधिकरणाचा दि ०५/०३/२०१५ चा निर्णय, वन विभागाने मा उच्च न्यायालयात, रिट याचिकेद्वारे (क्र ४५३५/२०१६) आव्हानित केला आहे. सदर याचिका मा उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. रिट याचिका क्र १३४४/२०२५ मध्ये, जमीन धारक यांनी दिलेल्या हमी पत्रानुसार, फेरफार नोंद ९७५ ची वैधता, ही रिट याचिका क्र ४५३५/२०१६ च्या आधीन आहे. सध्यस्थितीत शासनाच्या दिनांक ३१/१२/२०२५ च्या निर्णयाच्या अंमलबजावनीस स्थगिती दिलेली

असून, विभागाने दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने, वन विभागाचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी पुनर्विलोकन कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधीकारणाने, महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ च्या कलम १८ अन्वये उपरोक्त जमीन वन नसल्याचा निर्णय दिनांक ०५/०३/२०१५ रोजी घेतलेला आहे. मा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय वन विभागाने उच्च न्यायालयात रिट याचिका क्र ४५३५/२०१६ अन्वये आव्हानित केला आहे. या याचिकेमध्ये मा.न्यायालयाने, महसूल न्याधीकारणाचा निर्णययाची अंमल बजावणी स्थगित करणेबाबत अद्याप पर्यंत आदेश दिलेले नाहीत. याउपरोक्ष मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र १३४४/२०२५ मध्ये दिनांक ०७/०५/२०२५ रोजी व अवमान याचिका क्र. ४९९/२०२५ मध्ये दिनांक ३०/०६/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे दि ०५/०३/२०१५ च्या निर्णयाची अंमल बजावणी होणे आवश्यक होते. त्यानुसार अर्ध न्यायिक कार्यवाही मध्ये दि ३१/१२/२०२५ चा निर्णय शासनाने घेतलेला आहे. फेरफार नोंदींची फेरतपासणी कार्यवाही ही अर्धन्यायिक कार्यवाही आहे. शासनाच्या फेरतपासणी कार्यवाहीतील निर्णयाविरुध्द, केवळ मा.उच्च न्यायालयात रिट याचिकेद्वारे आव्हानित केले जाऊ शकते. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अस्तगाव (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथे खडी क्रशर व खाण पट्ट्यास दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत

**(१९)** * **७०७० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अस्तगाव (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथे दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या ग्रामसभेत गावाच्या शिवारात खडी क्रशर, खाणपट्टा होऊ नये असा ठराव करण्यात येऊन सदर ठिकाणी दोन स्टोन क्रशर, खाणपट्टा यासह ऊर्जा फुड्सला (पशुखाद्य आणि कुक्कुटपालन (Poultry) क्षेत्रात कार्यरत असलेली एक अग्रगण्य कंपनी) दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचा ठराव संमत करण्यात आला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अस्तगाव ग्रामसभेत ठराव झाल्यानंतरही सदर खडीक्रशर व खाणपट्टा व ऊर्जा फुड्स यांना ना-हरकत दाखला देण्यात आला असल्याने येथील संतप्त ग्रामस्थांनी पुन्हा एकदा ठराव घेऊन उक्त खाणपट्टा व ऊर्जा फुड्स यांना दिलेले ना-हरकत परवाना रद्द करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अस्तगाव येथील उक्त खाण पट्टा व ऊर्जा फुड्सचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अस्तगाव,ता.पारनेर, जि.अहिल्यानगर येथील दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजीची ग्रामसभा कोरम अभावी रद्द झाल्याने कोरम अभावी तहकूब सभा दिनांक ०९/१२/२०२२ रोजी घेण्यात येऊन सदरच्या ग्रामसभेत ठराव क्र. ६ मध्ये गावाच्या शिवारात यापुढे खडी क्रशर, खाणपट्यास ना-हरकत देऊ नये, असा ठराव करण्यात आलेला आहे.

तथापि, ग्रामसभेच्या ठरावात ऊर्जा फुड्सला दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचा ठराव झाले बाबत इतिवृत्तामध्ये दिसून येत नाही.

(२) दिनांक १९/१२/२०२५ रोजी आयोजित ग्रामसभेच्या ठराव क्र. १ नुसार स्टोनक्रशर व खाणपट्टा मंजूरी न देणेबाबत व यापूर्वी दिलेल्या परवानगी रद्द करण्याबाबतचा ठराव संमत झालेला आहे. व त्याच सभेत ठराव क्र.२/१ नुसार ऊर्जा फुडस् या कंपनीस नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचा ठराव संमत झालेला आहे.

(३) दिनांक १६/०२/२०२४ रोजीच्या ग्रामसभेतील ठराव क्र. ५ नुसार श्री साई स्टोन क्रशर या नावाने ग.नं. २८० मध्ये खाणपट्टा व खडीक्रशर व्यवसाय करण्यास ना-हरकत दिली आहे. दिनांक १६/०२/२०२४ रोजी झालेली ग्रामसभेतील ठराव क्र. ५ हा वैध ठरत असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांचे दिनांक १३/११/२०२५ च्या आदेशान्वये दगड खाणपट्टा मंजूर केलेला आहे. तथापि, ग्रामसभेच्या डिसेंबर २०२५ मधील ठरावानंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पारनेर यांनी दिनांक ०९/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १६/०२/२०२४ चा ठराव क्र. ५ वैध असलेबाबत कळविलेले आहे. तसेच ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक ११/१२/२०१५ नुसार एखादया ग्रामपंचायतीने संबंधित अर्जदारास एकदा ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर ते कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही, अशी तरतूद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्राम परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत कापूस वेचणी व साठवणूक पिशव्यांच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ८४७० श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्राम परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पात कापूस वेचणी व साठवणूक पिशव्यांच्या खरेदीत कृषी आयुक्तालयातील काही अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने अंदाजे तीन कोटीचा गैरव्यवहार झाल्याचे व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पुरवण्यात आलेल्या पिशव्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या असून चढ्या दराने खरेदी करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखापरीक्षकांनी या व्यवहारात आर्थिक अनियमितता झाल्याचे नमूद केले असून सदोष कापूस पिशवी खरेदीत साहित्य बदलून देण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची असूनदेखील त्याची अंमलबजावणी झालेली नसून सदोष साहित्य वितरित करणाऱ्या ठेकेदाराला देयक अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने करार उल्लंघन, गुणवत्ता चाचणी, प्रयोगशाळेच्या निवडीचा गैरप्रकार, गुणवत्ता चाचणी प्रक्रियेतील गोपनीयतेचा भंग, वित्तीय अनियमितता याबाबत दोषींवर कोणती प्रशासकीय कारवाई तसेच यासंदर्भात विद्यमान कृषी निविष्ठा व गुण नियंत्रक संचालक यांच्यावर सदरहू गैरव्यवहारासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) अंशतः खरे आहे.

मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत कापूस वेचणी व कापूस साठवणूक बॅग खरेदी ही राज्यस्तरावर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-कृषी तथा संचालक आत्मा यांचे मार्फत एकत्रित निविदा प्रक्रियेद्वारे, जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राष्ट्रीय खुली स्पर्धात्मक निविदा (NOCB) पध्दतीने करण्यात आलेली आहे.

अंदाजे तीन कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे ठोस निष्कर्ष शासनाच्या निदर्शनास आलेले नाहीत. तथापि, गुणवत्ता तपासणीदरम्यान पुरवठ्यातील नमुन्यांमध्ये तांत्रिक त्रुटी आढळून आल्या आहेत.

(२) होय,

बाह्य लेखापरीक्षण अहवालामध्ये नमुना तपासणी, वितरण व देयक अदा प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

करारानुसार सदोष साहित्य बदलून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची असल्याने देयकांमध्ये कमी गुणवत्तेच्या प्रमाणात १७.५ टक्के कपात करून काही देयके अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) होय,

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-कृषी तथा संचालक आत्मा यांचेमार्फत चौकशीअंती कापूस वेचणी बॅग्स खरेदी प्रक्रीयेमध्ये झालेल्या अनियमितेबाबतचा अहवाल पुढील कार्यवाहीस्तव कृषी आयुक्तालयास सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक वनीकरण विभाग, जव्हार कार्यालयात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२१)** * **७९५० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागाकडून पाणलोट विकास योजनेंतर्गत सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ या कालावधीत सामाजिक वनीकरण ठाणे विभागातील जव्हार, मोखाडा, वाडा तालुक्यात जल व मृद संधारण, अनगड दगडी बांध व तुटक समतल चर खोदणे व आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचेकडून सन २०१७-१८ या कालावधीमध्ये अनगड दगडी बांध व तुटक समतल चर खोदणे या कामासाठी एकूण ७८ कोटी १६ लाख ७८ हजार ८६८ रुपये निधी सामाजिक वनीकरण जव्हार विभागाला प्राप्त झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास जव्हार, मोखाडा, वाडा सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत कोणतेही काम न करता झालेला ७८ कोटी पेक्षा अधिक निधी सामाजिक वनीकरण विभागातील १० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर काढल्याची व सदर तीन तालुक्यातील ७४ गावांमध्ये आधीच झालेली ७९९ कामे नवीन म्हणून दाखवून शासकीय निधीचा अपहार केल्याची तक्रार जव्हार पोलीस ठाणे (एफ आय आर क्रमांक ०१९७) येथे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी नोंदवून तीन वर्षे उलटूनही अद्याप तक्रारीची चार्जशीट दाखल करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने शासकीय निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे,

सदर प्रकरणी जव्हार पोलीस ठाणे येथे १० अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द एफआयआर क्र.१९७, दिनांक १२/१०/२०२२ अन्वये गुन्हा दाखल केल्यानंतर गुन्हयातील आरोपी यांनी मा.विशेष जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे अटकपूर्व जामिन अर्ज दाखल केले होते. सदर अर्जांवर सुनावणी होवून जामिन अर्ज दिनांक ०३/०७/२०२३ अन्वये नामंजूर करण्यात आले होते. त्यानंतर आरोपी यांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे जामिन मिळणेकरीता अर्ज दाखल केले होते. मा.उच्च न्यायालयाने सदर जामिन अर्जाची सुनावणी पूर्ण होईपर्यंत तात्पुरता अंतरीम जामिन दिला आहे. त्यामुळे आरोपी यांना अटक करण्यात आलेली नाही. आरोपी यांचे जामिन अर्जावर दिनांक १३/०७/२०२३ ते दिनांक २३/०२/२०२६ पर्यंत वेगवेगळया तारखेस सुनावण्या झाल्या असून पुढील सुनावणी दिनांक २४/०३/२०२६ ठेवण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी यांची पोलीस कोठडी घेवून गुन्हयातील अपहरीत रकमेबाबत सखोल तपास करणे आवश्यक असल्याने तसेच सदर गुन्हयाची व्याप्ती ही व्यापक स्वरुपाची असल्याने तपासात एकूण १८९ साक्षीदार यांची विचारपूस करुन टिपणे नोंदविण्यात आली आहेत. गुन्हयातील आरोंपीकडे अधिक तपास बाकी असल्याने आरोपीं विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेले नाही. आरोपींच्या जामिन अर्जावर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर पुढील रितसर तपास करुन आरोपीविरुध्द दोषरोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) सदर प्रकरणी १० दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेपैकी ४ अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे व १ कर्मचारी मयत व १ कर्मचारी शासन सेवेत नियमित नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करणे शक्य झाले नाही. उर्वरित ४ अधिकारी / कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## 'आपले सरकार सेवा केंद्रां'मध्ये नागरिकांकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(२२) * ८२०५ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ‘आपले सरकार सेवा केंद्रां’मध्ये विविध दाखले, प्रमाणपत्रे व सेवा मिळविण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अतिरिक्त २०० ते ३०० रुपये नागरिकांकडून आकारले जात असून दरसूची केवळ नावापुरती उपलब्ध असून प्रत्यक्षात केंद्रचालकांकडून मनमानी पध्दतीने अतिरिक्त रक्कम उकळली जात असल्याचे दिसून येत असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे एका मराठी वृत्तपत्राने जळगाव येथे स्टींग ऑपरेशन करून माहे जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ‘आपले सरकार सेवा केंद्रांवर आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत तहसिलदार व संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रभावी देखरेख, तपासणी व नियंत्रण न ठेवल्यामुळे नियमांचे उल्लंघन होत असून, शासनाच्या लोकाभिमुख सेवेच्या उद्दिष्टांनाच बाधा निर्माण होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ‘आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये एकसमान दरसूचीचे सक्तीने प्रदर्शन, ऑनलाईन पेमेंटची अंमलबजावणी, नियमित तपासणी व तक्रार निवारण यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी तसेच आजपर्यंत आपले सरकार सेवाकेंद्र विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दिनांक ०४/०१/२०२६ रोजी दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रामध्ये “सेतूसह आपले सरकार दाखल्यांसाठी उकळतात अतिरिक्त २०० ते ३०० रुपये” अशा मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने दिनांक ०७/०१/२०२६ रोजी सदर आपले सेवा केंद्राची तहसिलदार जळगाव याचेकडुन चौकशी करण्यात आली असता शासन निर्धारित शुल्कानुसार आकारणी होत असल्याचे दिसुन आले आहे.

(२) व (३) दिनांक १९ जानेवारी २०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद तरतुदींनुसार सर्व आपले सरकार सेवा केंद्रांची तपासणी दरवर्षी नियमितपणे केली जाते. सदर शासन निर्णयातील तरतुदींचे उल्लंघन आपले सरकार सेवा केंद्रांकडून झाल्याची बाब निर्दशनास आल्यास आपले सरकार सेवा केंद्राचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असून जिल्हाधिकारी स्तरावर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई, ठाणे आणि रायगड परिसरात बेकायदेशीररित्या पर्ससीन आणि एलईडी मासेमारी सुरु असल्याबाबत

**(२३) * ७७५८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे आणि रायगड (करंजा बंदर) परिसरात प्रतिबंध असतानाही संगनमताने बेकायदेशीर पर्ससीन आणि एलईडी मासेमारी सुरु असून याद्वारे मत्स्यव्यवसाय विभागात कोटयवधी रकमेचा गैरव्यवहार सुरु असल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध पर्ससीन मासेमारीवर मत्स्य विभागाकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने पारंपारिक मच्छिमार हताश झाले असून वारंवार मागणी करुन देखील मत्स्य विभाग अवैध पर्ससीन नौकांना रोखु शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदा मासेमारीमुळे सागरी सुरक्षेपुढे आव्हान निमार्ण झाले असून त्यामुळे अवैध पध्दतीने म्हणजेच पर्ससीन, एलइडी मासेमारी प्रकरणी विशेष तपास पथक स्थापन करुन चौकशी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बेकायदा अनुदानित डिझेल पुरवठा आणि बोगस परवान्यांच्या बदल्यात गैरव्यवहार करणाऱ्या या अधिकाऱ्यांनी मच्छीमारांचे आर्थिक नुकसान केल्याने याबाबतच्या तक्रारी करुनही याप्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याची खंत मच्छीमारांकडून व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेकायदेशीर पर्ससीन आणि एलईडी मासेमारी रोखण्यासंदर्भात तसेच गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषिंविरोधात गुन्हे दाखल करण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

राज्याच्या जलधी क्षेत्रात माहे डिसेंबर २०२५ मध्ये ज्या मासेमारी नौकांमार्फत सागरी कायद्यातील तरतुदीचा भंग करून अनधिकृत पर्ससीन व एलईडी मासेमारी केल्याचे निदर्शनास आल्यास अशा अनधिकृत मासेमारी नौकांवर सागरी कायद्यातील तरतुदी अन्वये कारवाई करण्यात येत आहे. दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ ते माहे जानेवारी २०२६ पर्यंत एकूण १२३८ अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. त्यामध्ये अनधिकृत LED नौकां- १३७, अनधिकृत पर्ससीन नौका ३७९ यांचा समावेश आहे. उक्त नमूद अनधिकृत नौकापासून रुपये ७६८.४९ लक्ष इतकी दंडाची रक्कम म्हणून महसूल शासन जमा करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

पारंपारिक मच्छिमारांचे हितसंबंध जोपासून शाश्वत मासेमारी टिकून राहण्यासाठी अनधिकृत मासेमारीस आळा घालण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारणा-२०२१ नुसार) अनधिकृत पर्ससीन मासेमारी केल्याचे निदर्शनास आल्यास पहिल्या गुन्हासाठी एक लाख रुपये, दुसऱ्या गुन्हासाठी तीन लाख रुपये व तिसऱ्या आणि त्यानंतरच्या गुन्हासाठी सहा लाख रुपये दंडाची तरतूद आहे. याचबरोबर अनधिकृत एलईडी मासेमारी केल्याचे निदर्शनास आल्यास पहिल्या गुन्हासाठी पाच लाख रुपये, दुसऱ्या गुन्हासाठी दहा लाख रुपये व तिसऱ्या आणि त्यानंतरच्या गुन्हासाठी वीस लाख रुपये दंडाची तरतूद आहे. या तरतूदीनुसार अवैध पर्ससीन मासेमारी आढळून आल्यास कारवाई करण्यात आली आहृे

(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या अधिकारी कर्मचारी यांचेकडुन राज्याच्या जलधी क्षेत्रात गस्तीचे नियोजन करुन सागरी कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ (सुधारणा - २०२१) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १७/१२/२०२५ अन्वये १३० तांत्रिक पदांची निर्मिती करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) कृषी व पदुम विभागाच्या अ.शा. पत्र दिनांक १४ जानेवारी, १९९७ अन्वये सागरी जिल्ह्यातील मासेमारी नौकांना मासेमारी बंदी कालावधी वगळून (जून व जूलै) उर्वरित १० महिन्याच्या कालावधी करीता सिलेंडर निहाय डिझेल कोटा मंजूर करण्यात येतो. सदरचा डिझेल कोटा मंजूर करित असताना

विधिग्राह्य मासेमारी परवाना असलेल्या नौकांनाच डिझेल कोटा मंजूर करण्यात येत असतो. मच्छिमारांकडून तक्रार प्राप्त होताच त्याची तात्काळ दखल घेऊन नियमानुसार कारवाई करण्यात येते.

-----------------

## राज्यातील विमुक्त जाती-अ प्रवर्गातील बोगस जात प्रमाणपत्रातील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत

**(२४) * ८११७ श्री.सत्यजीत तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने विमुक्त जाती अ प्रवर्गामध्ये १४ जातींना आरक्षण तसेच ३% आरक्षणामध्ये बंजारासह १३ जातींना आरक्षण दिले असून विमुक्त जाती प्रवर्गामध्ये भामटा राजपूत आणि छप्परबंद जाती समाविष्ट असून या नावातील साम्य लक्षात घेऊन बोगस भामटा राजपूत आणि छप्परबंद समाज जाती विमुक्त जाती- अ प्रवर्गामध्ये जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र काढून अवैधपणे लाभ घेणाऱ्या जाती प्रगत असून मूळ विमुक्त जाती अ चे आरक्षणाचा लाभ घेत असून या जाती व्यावसायिक अभ्यासक्रम वैद्यकीय, इंजिनिअरिंग प्रवेश व सरकारी नोकऱ्यांमध्ये ५०% हून अधिक लाभ घेत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मराठवाडा, विदर्भ, खानदेश या विभागातील उपविभागीय अधिकारी आणि जात पडताळणी प्रमाणपत्र समिती मधील अधिकारी उक्त अवैधपणे लाभ घेणाऱ्याना सदर जात प्रमाणपत्र दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१ पूर्वीचा वास्तव्याचा कोणताही पुरावा नसताना व नियमाचे पालन न करता देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१ पूर्वीचा पुरावा आवश्यक असतानाही हा नियम डावलून जात प्रमाणपत्र दिले जात असल्याने शैक्षणिक प्रवेश व नोकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होत असून विमुक्त जातींच्या खऱ्या पात्र उमेदवारांवर अन्याय होत असून त्यांच्या हक्कांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०२४ ते माहे डिसेंबर, २०२५ या कालावधीत सुमारे १९०० पेक्षा जास्त प्रकरणांवर हरकती घेऊनही संबंधित प्रशासकीय यंत्रणेने दोषींवर कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने दोषी उमेदवार व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यासाठी विशेष चौकशी समिती (SIT) नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच मानवी दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१ पूर्वीचा पुरावा आवश्यक असतानाही हा नियम जात प्रमाणपत्र देतांना डावलण्यात येत असल्याने खऱ्या लाभ घेऊन इच्छिणाऱ्या उक्त समाजातील नागरिकांवरील अन्याय दूर करण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

राज्यात मागासवर्गीयांना जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३) व सदर अधिनियमांतर्गत अधिसूचित नियम २०१२ मध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राकरीता आवश्यक असलेल्या दस्तऐवजांच्या प्रती अर्जदाराने सादर केल्यावर जात प्रमाणपत्र महसूल विभागाकडून दिले जाते व जात वैधता प्रमाणपत्र सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून दिले जाते.

(३) हे खरे नाही.

दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१ पूर्वीचा मानीव दिनांकाचा महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवासाचा पुरावा नसल्यास संबंधित अर्जदार यांना जात प्रमाणपत्र दिले जात नाही.

(४) हे खरे नाही.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलढाणा यांनी विमुक्त जाती-अ प्रवर्गातील राजपूत भामटा व छप्परबंद या जातीचे विहित प्रक्रियेचा अवलंब न करता जात वैधता प्रमाणपत्र दिल्याचे निष्पन्न होत असल्याचे महासंचालक, बार्टी, पुणे यांनी कळविले आहे. त्यानुसार तत्कालिन उपायुक्त तथा सदस्य श्रीमती वृषाली शिंदे व सदस्य सचिव श्रीमती अनिता राठोड यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच त्यांना शासन आदेश दिनांक ११/१२/२०२५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.

तसेच, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शासन निर्णय, दिनांक ११/१०/२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या विमुक्त जाती / भटक्या जमाती प्रवर्गातील जातीच्या यादीमध्ये राज्यात बोगस जात प्रमाणपत्राची विशिष्ट तक्रार (मोघम स्वरुपाच्या तक्रारी वगळून) प्राप्त झाल्यास त्याची सखोल तपासणी करण्याच्या अनुषंगाने समिती गठित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लिहाखेडी (ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शासकीय कृषी महाविद्यालयाच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२५)** * ८४५५ **श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लिहाखेडी (ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठांतर्गत शासकीय कृषी महाविद्यालय मंजूर असूनही अदयाप महाविद्यालय इमारतीसाठीच्या निधीला प्रशासकीय मंजूरी मिळालेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिहाखेडी (ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे इमारत नसल्याने मागील दोन वर्षापासून सदर महाविद्यालय तात्पुरत्या स्वरुपात महानुभाव आश्रम चौकालगतच्या राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाच्या इमारतीत सुरु असून गत दोन वर्षात प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लिहाखेडी येथील शासकीय कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी निधी व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करुन भरण्याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुन देखील अदयाप दखल घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लिहाखेडी शासकीय कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी निधी व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) व (२) होय,
(३) व (४) मौजे लिहाखेडी, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कृषी महाविद्यालयाकरीता इमारतीच्या बांधकामाचा अंदाजपत्रकीय प्रस्ताव विद्यापीठ अभियंता, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता.तथापि, या अंदाजपत्रकीय प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्याने प्रस्तावाची फेरतपासणी करुन परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या आस्थापनांवरील पदांचा आकृतिबंध अद्यायावत करण्याची कार्यवाही अंतिम टप्यात असून, आकृतिबंध मंजूर झाल्यावर शासनाच्या पदभरतीविषयक धोरणानुसार सदर कृषी महाविद्यालयात रिक्त असलेली शिक्षक व शिक्षकेतर पदे भरण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील आधारभूत भात खरेदी योजना सुरु करण्याबाबत

**(२६) * ८३१६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळामार्फत राबवली जाणारी ‘आधारभूत भात खरेदी योजना ही प्रामुख्याने आदिवासी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी असून विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) आदिवासी विकास महामंडळामार्फत राबवली जाणारी आधारभूत भात खरेदी योजना पूर्णपणे बंद असून जानेवारी महिना सुरूहोऊनही तालुक्यात मंजूर झालेल्या ६ पैकी एकाही केंद्रावर प्रत्यक्ष खरेदीला सुरुवात न झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिकदृष्ट्या नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) हजारो शेतकऱ्यांकडून आत्तापर्यंत ६० हजार क्विंटल भात खरेदी करणे अपेक्षित असतानाही खरेदी सुरू न झाल्याने हजारो शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आदिवासी विकास महामंडळामार्फत राबवल्या जाणाऱ्या आधारभूत भात खरेदी योजनेची तात्काळ अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने तसेच शेतकऱ्यांची झालेली आर्थिक नुकसान भरपाई मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) व (२) हे खरे नाही,

आदिवासी विकास महामंडळ अंतर्गत प्रादेशिक कार्यालय जव्हार मार्फत जानेवारी अखेर विक्रमगड तालुक्यात ०७ खरेदी केंद्रांवर ३०४५ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. मंजूर खरेदी केंद्रांपैकी ०५ खरेदी केंद्रावर धान खरेदी सुरू करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) घरकुलांचे बांधकाम करणाऱ्या मजुरांची मजूरी थकीत असल्याबाबत

**(२७) * ७०९१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील घरकुलांच्या बांधकामावर काम करणाऱ्या हजारो मजुरांची ६१ लाखाहून अधिक रुपयांची मजुरी मागील दीड वर्षापासून थकीत असल्याने या मजुरांची उपासमार होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर रक्कम तातडीने मंजूर करून मजुरांच्या खात्यात वर्ग करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील घरकुलांच्या बांधकामावर काम करणाऱ्या मजुरांची मजूरी देण्यास विलंब लावणाऱ्या अधिकारी/कंत्राटदार यांच्याविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) घरकुल व इतर कामांवर काम करणाऱ्या ३४७२ मजुरांचे रुपये ६०,५८,२९६/- रकमेचे ५ FTO प्रलंबित आहेत.

(२) केंद्र शासनाकडे पाठपुरावा केल्यामुळे मजुरीसाठी रुपये १४०९ कोटी निधी मंजूर झाला आहे. उपरोक्त ५ FTO मधील तांत्रिक अडचणी दूर करुन निधी वितरणाची बाब कार्यवाहीत आहे.

(३) पंचायत समिती, शहापूर यांच्या मार्फत ११३९८ मजुरांच्या रुपये १.९१ कोटी रकमेच्या मजुरीचे ३८ FTO केंद्र शासनास माहे सप्टेंबर २०२५ मध्ये सादर केले होते. त्यापैकी ७९२६ मजुरांच्या मजुरीचे रुपये १.३१ कोटी रकमेचे ३३ FTO मंजूर झालेले असून सदर रक्कम मजुरांच्या खाती जमा झाली आहे. उर्वरित ३४७२ मजुरांच्या मजुरीचे रक्कम रुपये ६०,५८,२९६/- रकमेचे ५ FTO तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित होते. केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या उपरोक्त निधीतून वितरणाची बाब कार्यवाहीत आहे. तथापि, ५ FTO च्या प्रलंबिततेबाबत चौकशी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी ठाणे यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) विलंब झाला नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील वाढवण बंदर उभारणीस स्थानिकांचा विरोधात असल्याबाबत

**(२८)** * **८४८९ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील प्रस्तावित वाढवण बंदर, मुरबे बंदर, टेक्सटाईल पार्क, समुद्रात उभारण्यात येणारे विमानतळ इ.मुळे स्थानिक भूमिपूत्र, मच्छिमार, शेतकरी बांधवांच्या उपजिविकेवर मोठा परिणाम होणार असल्याने यास स्थानिकांनी विरोध दर्शवून वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली मच्छिमार व भूमिपुत्रांनी तसेच जिल्ह्यातील विविध संघटनानी दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, पालघर यांच्या कार्यालयावर मोर्चा काढून जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाढवण बंदर उभारणे पर्यावरणास घातक असून हजारो कुटुंबांचा पारंपारिक मासेमारी व इतर व्यवसाय व उपजिवीकेचे साधन नष्ट होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्थानिक भूमिपूत्र, मच्छिमार, शेतकरी बांधवांच्या उपजिविकेकरीता इतर पर्याय उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयावर दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती व इतर संघटनांच्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता.त्यावेळी वाढवण बंदर संबंधित त्यांच्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केले आहे.

(२) पर्यावरणाचे सर्व नियम पाळून वाढवण बंदर प्रकल्प हा राबविण्यात येत आहे. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने (JNPA) या प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी, देशातील नामांकित सरकारी संस्थांकडून पर्यावरण प्रभाव मूल्यांकन पूर्ण करण्यात आले आहे. वाढवण प्रकल्पासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाकडून आवश्यक सर्व परवानग्या घेण्यात आलेल्या आहेत. तसेच स्थानिक मच्छिमारांच्या मासेमारी क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आलेला असून पारंपारिक मासेमारी बाधित होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.

(३) ग्रामीण भागासाठी भूसंपादनासाठीची भरपाई ही Right to Fair Compensation and Transparency in Acquisition, Rehabilitation and Resettlement Act-२०१३ मधील तरतुदींनुसार दिली जाणार आहे. तसेच वाढवण बंदर प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या मच्छिमारांसाठी नुकसान भरपाई धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

वाढवण बंदर हा एक प्रमुख व महत्वाचा प्रकल्प आहे. वाढवण बंदराच्या बांधकामाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी, यांत्रिक आणि इतर सुविधांच्या स्थापनेच्या माध्यमातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होणार आहेत.

स्थानिक तरुणांना सागरी आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी नामांकित संस्थासोबत सामंजस्य करार आलेले आहेत. त्यामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार तसेच स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यास मदत होणार आहे. कौशल्य विकासामुळे स्थानिकांच्या रोजगार क्षमतेत वाढ होऊन आर्थिक तसेच सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## भंडारा-नागपूर महामार्गावर अवैधरित्या रेती वाहतूक होत असल्याबाबत

**(२९)** * **८२१६ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर मौदा ते बोरगाव दरम्यान विना रॉयल्टी रेतीची अवैधरित्या वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असून, क्षमतेपेक्षा जास्त भरलेल्या रेतीच्या वेगात जाणाऱ्या टिपर्समुळे अपघाताची भीती वाढली असून विना रॉयल्टी वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल व पोलीस विभागाचे काही कर्मचारी रेती माफियांसोबत आर्थिक हितसंबंध जोपासत असल्यामुळे या अवैध कृत्यांकडे दुर्लक्ष करून नियमांचे उल्लंघन केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरप्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने भंडारा-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर मौदा ते बोरगाव दरम्यान विना रॉयल्टी रेतीची मोठ्या प्रमाणात होणारी अवैधरित्या वाहतूक रोखण्याकरीता तसेच महामार्गावरील सदर वाहतूक रोखण्यासाठी तपासणी नाके किंवा सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारी जिल्हाधिकारी अथवा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) हे खरे नाही.

महसूल विभागाने अवैध गौण खनिज व चोरी रोखण्यासाठी प्रत्येक तालुक्यात भरारी पथके तयार केली असून, मौदा तालुक्यामध्ये ७ अवैध गौणखनिज नियंत्रण पथक तयार केलेली आहेत. सदर पथके राष्ट्रीय महामार्गावर गस्त घालत आहेत तसेच अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्या वाहनावर दंडात्मक कारवाई केली जात आहे. तसेच पोलीस विभाग यांनी मौजा माथनी येथे २४x७ तपासणी नाका उभारलेला आहे. सदर ठिकाणी अवैध गौण खनिज वाहनांची तपासणी केली जात आहे.

पोलीस विभाग यांनी मौजा माथनी येथे २४x७ तपासणी नाका उभारलेला आहे. सदर ठिकाणी अवैध गौण खनिज वाहनाची तपासणी केली जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील सह दुय्यम निबंधक यांनी विकासकाचे करारनामे आणि मुखत्यारपत्र नोंदणी करताना शासनाच्या महसूलाचे नुकसान केल्याबाबत

**(३०)** * **७७५९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील नोंदणी कार्यालय क्र.९ मधील सह दुय्यम निबंधक यांनी गेल्या तीन वर्षात विकासकाचे करारनामे आणि मुखत्यारपत्र नोंदणी करताना शासनाच्या कोटयवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च ते मे या कालावधीतील विवरणपत्रात त्यांनी विकासकाच्या करारनामाच्या तीन दस्तांवर ३० लाख ५७ हजार ३२५ रुपये कमी मुद्रांक शुल्क आकारुन विकासकाचा आर्थिक फायदा करुन दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एका विशिष्ट प्रकरणात सुमारे ३८ लाख ४३ हजार ८९८ रुपये मुद्रांक शुल्क अपेक्षित असताना केवळ १४ हजार ६४० रुपये नोंदणी शुल्क आकारुन शासनाची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, जमिनीचे बाजारमुल्य कमी दाखवणे आणि क्षेत्रफळ ५०० चौ.मी.पेक्षा कमी दाखवून शुल्क चुकविल्याबाबतचा अहवाल ठाणे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी वरिष्ठ कार्यालयाला सादर करुनही संबंधित अधिकाऱ्यावर अद्याप कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गैरव्यवहाराची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करुन संबंधित दोषींवर कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी श्री.जयंत जोपळे, तत्का. सह दुय्यम निबंधक वर्ग-२, ठाणे क्र. ९ यांना शासनाच्या दिनांक ११/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी-शनिशिंगणापूर नवीन रेल्वे मार्गासाठीच्या भूसंपादनामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत

**(३१)** * **८१२७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राहुरी व नेवासा तालुक्यातून (जि.अहिल्यानगर) जाणाऱ्या २१.८४ कि.मी.च्या राहुरी-शनिशिंगणापूर या नव्या रेल्वेमार्गासाठी भूसंपादनाची प्राथमिक अधिसूचना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये प्रसिध्द करण्यात आली असून या रेल्वे प्रकल्पामुळे राहुरी व नेवासा परिसरातील शेकडो शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या कसलेल्या सुपीक जमिनी संपादित होणार असल्याने शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे घर, विहीर, जनावरांचे गोठे आणि शेतीतील फळझाडांचे नुकसान व शेतात जाण्यासाठीचे रस्ते बंद होणार असल्यामुळे शेतकऱ्यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होऊन त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूसंपादनाच्या या प्रक्रियेत जमिनीच्या बाजारभावाप्रमाणे मोबदला मिळण्याबाबत प्रशासनाकडून कोणतीही लेखी स्पष्टता न मिळाल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रेल्वे मार्गासाठी होत असलेल्या या भूसंपादनामुळे बाधित शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई व वाढीव मोबदला तसेच पर्यायी रस्ते उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) राहुरी-शनिशिंगणापूर, जि.अहिल्यानगर नव्या रेल्वेमार्गासाठी प्रारुप अधिसूचना २०A नेवासा तालुक्याकरीता दिनांक २२/१२/२०२५ रोजी व दिनांक ११/०२/२०२६ रोजी तसेच राहुरी तालुक्याकरीता दिनांक १०/१२/२०२५ रोजी रेल्वे मंत्रालय, भारत सरकारच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेली आहे.

सदर भुसंपादन प्रक्रिया भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व रेल्वे दुरूस्ती अधिनियम, २००८ अंतर्गत करण्यात येत असून भुसंपादित जमिनींना उचित व वाजवी मोबदला देण्याचे नियोजित आहे.

सदर प्रकल्पाच्या आखणीनुसार शेतजमिनी व गावांशी असलेला संपर्क अबाधित राहावा यासाठी आवश्यक रेल्वे उड्डाणपुल/रेल्वे भुयारी मार्ग तसेच इतर पूरक व्यवस्था करण्याबाबत आवश्यक ती दक्षता रेल्वे मार्फत घेण्यात येत आहेत.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.